# सराफ चौधरी नगर को-ऑप. हौसिंग सोसायटीज् असोसिएशन लि.

नोंदणी क्रमांक : एमयुएम / एमएचएडीबी / जीईएन / ओ / १३५२३ / २०२२-२०२३ दिनांक : १५ / ०३ / २०२३

अ/०६, ५१-५३, सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

संदर्भ क्र. : SCN Assoc./२२८/२०२४

दिनांक २६/१२/२०२४

**परिपत्रक क्र.- १६**

प्रति,
मा.अध्यक्ष / सचिव,
सराफ चौधरी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था (क्र.१,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३ व बी-१५) मर्या.,
सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल,कांदिवली पूर्व, मुंबई ४००१०१.

महोदय/ महोदया,

सराफ चौधरी नगर वसाहतीतील संस्था क्र. १ ते १४ चे सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येत आहे कि, दिनांक ०३/०३/२०२४ रोजी मा. उपनिबंधक सहकारी संस्था , म्हाडा यांच्या मार्गदर्शनाखाली असोसिएशनमार्फत संस्था क्र.१ ते १४ चे सर्व सन्माननीय सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा घेऊन एस.सी.एन. वसाहतीतील १४ संस्थांच्या एकत्रित समूह पुनर्विकासाकरिता कलम ७९ (अ) अन्वये प्रक्रिया पार पडून विकासक मे.सोनम स्पार्क इन्फ्रा प्रा. ली. या विकासकाची बहुमताने मा.उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा समक्ष यांच्या निवड करण्यात आली होती. तदनंतर निविदा (Tender) मधील नमूद अटी (Term Sheet) प्रमाणे विकासक यांना तीन महिन्यामध्ये पुढील पुनर्विकासाची प्रक्रिया पार पाडण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे विकासक यांनी त्यांचे स्थरावर कामास सुरुवात केली होती. परंतु आपल्या प्लॉट मध्ये असलेले बीएमसी रिझर्वेशन (Play Ground, School) काढणे तसेच COD इत्यादीमुळे विकासक यांना वाढीव तीन महिन्याची मुदतही देण्यात आली होती. या कालावधीमध्ये विकासक यांच्याकडून करण्यात आलेल्या कामाचा Bar chart देण्याबाबत असोसिएशन मार्फत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. त्यावर विकासक यांनी सध्या निवडणुकीचा कालावधी असल्याने डिसेंबर पर्यत अवधी मिळणेबाबत लेखी पत्राने विनंती केली होती. त्याप्रमाणे विकासकांना पुन्हा वाढीव मुदत देण्यात आली व Term Sheet प्रमाणे ठरलेल्या बाबींची पूर्तता करण्याबाबत विकासक यांना कळविण्यात आले होते. परंतु विकासक यांनी Term Sheet मधील नमूद अटी व शर्तींची पूर्तता न करता दिनांक १३/१२/२०२४ रोजीचे पत्राने एस.सी.एन. वसाहतीचा पुनर्विकास करण्यास त्यांचे वैयक्तिक अडचणीमुळे पुनर्विकास प्रक्रियेतून माघार घेतली असून असोसिएशन यांनी संकुलाच्या पुनर्विकासाची पुढील प्रक्रिया राबविण्यासाठी त्यांची हरकत नसल्याचे कळविले आहे.

तरी सर्व संस्थ्यांच्या सभासदांना कळविण्यात येते कि,एस.सी.एन.वसाहतीतील सर्व संस्थांच्या सभासदांची असोसिएशनमार्फत विशेष सर्वसाधारण सभा लवकरच आयोजित करून सभेत याबाबतची सविस्तर माहिती देण्यात येईल व त्या सभेत पुनर्विकासाची पुढील रूपरेषाही ठरविण्यात येईल. सदर घेण्यात येणाऱ्या विशेष सर्व साधारण सभेची विषयपत्रिका सर्व संस्थांच्या सभासदांना त्यांचे संस्थेमार्फत लवकरात लवकर देण्याची तजवीज ठेवली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

पुनर्विकास प्रकल्पाचे व असोसिएशनचे कामकाजाची माहिती वेळोवेळी सराफ चौधरी वसाहतीतील सर्व सभासद/ रहिवाशांना कळविण्याचे तजवीज ठेवली आहे.

कार्यकारिणी समिती व उपसमिती यांच्या मान्यतेने,

आपले विश्वासू,

| | |
|---|---|
| उपाध्यक्ष | सचिव |
| हिम्मतराव पाटील | रघुनाथ बा.दळवी |

सराफ चौधरी नगर को-ऑप.हौसिंग सोसायटीज असोसिएशन लि.

**टीप:**- १ ते १४ संस्थांच्या अध्यक्ष / सचिव यांना विनंती करण्यात येते की, हे परिपत्रक आप-आपल्या संस्थेतील सर्व सभासदांना देण्याची व्यवस्था करावी.